# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

दिनांक 15/04/2021 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

### अवैधरीत्या मोहाफुल दारुची वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक पोलिस स्टेशन पारशिवनी ची कार्यवाही

पो.स्टे. पारशिवनी :– दिनांक 14/04/2021 रोजी पो.स्टे. पारशिवनी येथील पोलिस स्टाफ पो. स्टे. परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना विश्वसनीय माहिती मिळाली की, एक इसम हा गावठी मोहाफुल हातभट्टीची दारू गाळण्याचा अवैधरीत्या व विनापरवाना वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पारशिवनी पोलीसांनी दिनांक 14/04/2021 चे 15.30 वा. ते 16.15 वा. मौजा नयाकुंड येथे नाकाबंदी करून एमएच–04/ईएफ–9053 क्रमांकाच्या पांढऱ्या रंगाची महिंद्रा झायलो गाडीला थांबवुन तपासनी केली असता सदर वाहनामध्ये आरोपी नामे– आकाश बिहारीलाल टेकाम वय 25 रा. पटगोवारी याच्या ताब्यातुन अवैधरित्या विना परवाना एक रबरी टयुब ज्यामध्ये 50 लिटर मोहाफुल दारू किमती 20,000/–रू. चा मुद्देमाल वाहतुक करतांना मिळून आला. घटनास्थळावरून 50 लिटर मोहाफुल 20,000/–रू. व एमएच–04/ईएफ–9053 क्रमांकाची महिंद्रा झायलो असा एकुण कि. 5,20,000/–रू. मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस नाईक रोशन काळे पो. स्टे. पारशिवनी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 65 (अ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री उबाळे मो क 7498179174 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग श्रीमती नयन आलुरकर यांचे मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक श्री. संतोष वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक उबाळे, पोलीस नाईक संदीप कळु, तौसीफ अंसारी, रोशन काळे, मुद्दसर जमाल, पोशि महेन्द्र जोईतकर यांनी पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर